R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८

दि. १४ डिसेंबर २०२५, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

लातूर, : जवळपास सहा दशके आपल्या केले. दिले केला, संसदीय परंपरेला नवा आयाम भूषवत देशाची सेवा केली. लोकसभा अध्यक्ष त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सुसंस्कृत







सुसंकृत राजकारणाने जनसेवा करणारे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शनिवार वरवंटी (ता. लातूर) येथे शासकीय इतमामात, मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच पोलीस दलाच्या जवानांनी यावेळी बंदुकीच्या फैरींची सलामी देऊन मानवंदना दिली.

तत्पूर्वी सकाळी देवघर निवासस्थानी शिवराज पाटील यांच्या पार्थिवाला पोलीस दलातर्फे मानवंदना दिल्यानंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली. फुलांनी सजविलेल्या रथातून त्यांचे पार्थिव औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पीव्हीआर चौकमार्गे वरवंटी येथे पाटील चाकूरकर कुटुंबियांच्या शेतामध्ये आणण्यात आले. याठिकाणी शोकाकुल जनसमुदायाच्या उपस्थितीत शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले.

कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वर खंड्रे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. भागवत कराड, खासदार रजनीताई पाटील, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुबा, माजी खासदार चंद्रकांत खैरे, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पंजाब पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक इंदरवर सिंग, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश नरेश पाटील, अखिल भारतीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही यावेळी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या ६ दशकांच्या राजकीय, सामाजिक जीवनात प्रामाणिकपणे देशाची सेवा केली. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी भरीव योगदान दिला. संसदीय समित्यांसाठी त्यांनी पुढाकार घेतला. राजकारणातील त्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील, अशा शब्दात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असल्याचे सांगून केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ म्हणाले की, राष्ट्रासाठी समर्पित भावनेने काम करणारा आणि लोकशाहीला मजबूत बनविण्यासाठी प्रयत्न करणारा एक विनम्र राजकारणी आपण गमावला आहे. त्यांच्या निधनाने मोठे नुकसान झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्यासोबत १९६७ पासून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी विविध पदांवर काम करताना समाजाची सेवा करत विकासासाठी भरीव योगदान दिले. त्यांची उणीव सदैव भासत राहील, असे राज्यसभा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले.

चिंतनशील राजकारणी अशी ओळख असलेले शिवराज पाटील चाकूरकर हे आपल्यासाठी एक मार्गदर्शक, एक आदर्श होते. त्यांनी केंद्र सरकारमध्ये विविध मंत्री पदे असताना त्यांनी केलेले काम संस्मरणीय होते, असे सांगून कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वर खंड्रे यांनी त्यांना कर्नाटक सरकारच्यावतीने श्रद्धांजली अर्पण केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी नगरपरिषदेचे अध्यक्ष ते लोकसभेचे अध्यक्ष पदापर्यंतच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. अतिशय शिस्तप्रिय आणि वैचारिक मूल्य असणारे राजकारण, सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध हे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या राजकीय जीवनाचे वैशिष्ट्य होते. त्यांचे आपल्यातून निघून जाणे अतिशय वेदनादायी असल्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले.

गेली सहा दशके राज्याची, देशाची प्रामाणिकपणे सेवा करताना शिवराज पाटील चाकूरकर यांनी शेतकरी, कष्टकरी, महिला, सुशिक्षित युवा वर्ग यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या पदांचा उपयोग केला. ते एक अजातशत्रू, चिंतनशील, अभ्यासू व तत्वनिष्ठ राजकारणी होते. त्यांची उणीव सर्वांना जाणवेल, अशी भावना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केली.

शिवराज पाटील चाकूरकर हे सुसंस्कृत राजकारणी म्हणून परिचित होते. लातूर जिल्ह्याच्या राजकारणाला सुसंस्कृत बनविण्यात नेतृत्वाचा वारसा पुढे घेऊन जाणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यावेळी म्हणाले.

खासदार म्हणून काम करताना शिवराज पाटील चाकूरकर यांचे आपल्याला सदैव मार्गदर्शन लाभल्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले. तसेच त्याबाबतच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या.

सुसंस्कृत आणि चारित्र्यसंपन्न राजकारणी अशी ओळख असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे. त्यांच्या जवळपास साठ वर्षांच्या राजकारणात त्यांनी अनेकांना घडविले. त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाल्याचे माजी मंत्री बसवराज पाटील यावेळी म्हणाले.

राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कर्नाटकमधील आमदार बी. आर. पाटील, महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी खासदार सुधाकर शृंगारे, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने

## दिल्ली हरियाणाचे शासकीय कामकाज परिपुर्ण करून समाजभूषण : उत्तमराव तरकसे यांची मुंबई वापसी

नवी दिल्ली / प्रतिनिधी :- समाजभूषण उत्तमराव तरकसे (आसरडोहकर) महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत, हे काही शासकीय कामकाजा निमित्त आठ दिवसाच्या दिल्ली, नवी दिल्ली प्रामुख्याने हरियाणा राज्यातील गुडगाव, फरीदाबाद, मेवात,पलवल,रेवाडी,इज्जर,सोनीपत,पानिपत करनाल व कुरुक्षेत्र या जिल्ह्यातील काही शासकीय कामकाजा निमित्त दौऱ्यावर असताना शासकीय कामकाज पुर्ण करुन फुरसत मिळालेल्या वेळेत सदर जिल्ह्यातील रहिवासी फारुख खान, चंदन सिंग बोरा, संदीप सिंग,अनिल शर्मा,अहमद खान,यांचे सोबत









सदर राज्यातील जिल्ह्यांमध्ये जाऊन शासकीय कामकाजासोबतच तेथील सामान्य नागरिकांच्या सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक,आर्थिक व कृषी अशा विविध विषयावर सखोल व गांभीर्यपूर्वक विषयाचे अवलोकन केले सोबत सपोनी प्रदीप आव्हाड अशोक पाईकराव व संपूर्ण टीम होतीच त्यांनी सुद्धा सदर विषयावर चर्चा व अवलोकन करण्याकरिता तरकसे साहेबांना खूप मदत केल्याने तरकसे साहेबांनी सर्व टीमचे व सदर परिसरातील ज्ञात अज्ञात सुज्ञ नागरिक ज्यांनी मला सदर परिसरातील वरील विषयावर सखोल माहिती दिल्याबद्दल समाजभूषण उत्तमराव तरकसे यांनी सर्वांचे खूप खूप मनापासून आभार मानले

सदरचा आठ दिवसाचा दौरा करून नवी दिल्ली श्रीमती इंदिरा गांधी या विमानतळावरून विमान आकाश मार्गे छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ सांताक्रुज मुंबई येथे मोठ्या उत्साहात परतले.

## मुंबईत ५० एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर‘क्लस्टर रिडेव्हलपमेंट’ राबवणार; पहिल्या टप्प्यात १७ प्रकल्पांची निवड

नागपूर : मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पामधील लाभार्थ्यांना दिलासा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी १७ ठिकाणी एसआरए समुह पुनर्विकास प्रकल्पाच्या घोषणेसोबतच ‘एसआरए अभय योजने’ला डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ, तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी ‘एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटींची संख्या वाढविण्याच्या घोषणांचा समावेश आहे. त्याचबरोबर म्हाडाच्या ओसीसाठीच्या अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ आणि मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवरील महापालिका कर्मचाऱ्यांनी बांधलेल्या घरांकरीता नवीन योजना करण्याची घोषणा देखील त्यांनी केली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात मुंबईतील अँटॉप हिल, कृष्ण नगर आणि केतकीपाडा (बोरिवली), गोपीकृष्ण नगर (दहिसर),ओशिवरा, गोवंडी, चित्ता कॅम्प (ट्रॉम्बे), चेंबूर, टागोर नगर (विक्रोळी), विक्रोळी पार्कसाईट, भांडुप या १७ प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यासंदर्भात निवेदन करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईतील ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे पुनर्विकास केला जाणार आहे. छोट्या-छोट्या एसआरए प्रकल्पांऐवजी आता संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यासाठी ही योजना राबवली जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेला राज्य मंत्रिमंडळाने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यता दिली असून, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

हे प्रकल्प रखडू नयेत आणि जलदगतीने पूर्ण व्हावेत, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी, एमएसआरडीसी, म्हाडा आणि मुंबई महानगरपालिका या शासकीय संस्थांच्या मदतीने ‘जॉइंट व्हेंचर’ तत्त्वावर हे प्रकल्प उभारले जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी काही प्रकल्प हाती घेतले जाणार असून त्यामुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलण्यास आणि सुनियोजित शहरे वसण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

एसआरए अभय योजने‘ला ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ मुंबईतील हजारो झोपडीधारकांसाठी दिलासा देताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी झोपडी खरेदी-विक्रीच्या तांत्रिक अडचणीत अडकलेल्या नागरिकांसाठी ‘एसआरए अभय योजने’ची मुदत आता डिसेंबर २०२६ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली.

अनेक झोपडीधारकांनी आपल्या झोपड्यांची खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण केले होते. मात्र, नियमानुसार या नवीन झोपडीधारकांचे नाव ‘अंतिम परिशिष्ट-२’ मध्ये (पात्र झोपडीधारकांच्या यादीत) समाविष्ट करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. यामुळे हजारो गरीब कुटुंब हक्काच्या घरापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे राज्य शासनाने १ ऑक्टोबर २०२४ रोजी ‘अभय योजना’ लागू केली होती. सुरुवातीला ही योजना ३ महिन्यांसाठी होती नंतर तिला मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती.यासोबतच म्हाडाच्या ओसी साठीच्या अभय योजनेला देखील सध्या सुरू आहे. एक वर्षाची मुदतवाढ देण्याची घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी केली.

एसआरए प्रकल्पाच्या तक्रार निपटाऱ्यासाठी एजीआरसीची संख्या वाढविणार झोपडपट्टी पुनर्विकासाशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी असलेल्या ‘एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटी’ची (एजीआरसी) संख्या वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. सद्यस्थितीत २१०३ प्रकरणे प्रलंबित असून त्यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी एजीआरसीची संख्या वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांची जी घरं बांधलेली आहेत त्याकरिता नवीन योजना आणण्याचे निर्देश महापालिकेला दिले असल्याची घोषणा देखील उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली.

## संपादकीय...

# शिवराज पाटील चाकूरकर : आजच्या राजकारणाला न शोभणारा सुसंस्कृत वारसा

आजचे भारतीय राजकारण आरडाओरड, ध्रुवीकरण, भावनिक घोषणाबाजी आणि सततच्या संशयाच्या वातावरणात अडकलेले असताना शिवराज पाटील चाकूरकर यांचे अनंतात विलीन होणे हे एका व्यक्तीचे जाणे नसून एका राजकीय संस्कृतीचे हळूहळू होणारे विस्मरण आहे. सत्तेचा आवाज जिथे विवेकावर भारी पडतो, तिथे चाकूरकर यांची शांत, संयमी आणि संविधाननिष्ठ शैली आज अप्रासंगिक ठरवली गेली असतीआणि हीच आजच्या राजकारणाची शोकांतिका आहे. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेला लोकशाहीचे मंदिर मानले. आज मात्र संसद अनेकदा घोषणांनी ठप्प होते, विधेयके चर्चेविना मंजूर होतात आणि प्रश्न विचारणे अडथळा मानले जाते. चाकूरकर यांचा अध्यक्षपदाचा काळ सांगतो की बहुमत म्हणजे मनमानी नव्हे; नियम, परंपरा आणि विरोधकांचा सन्मान हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. आजच्या सत्ताकेंद्रित संसदीय कार्यपद्धतीत हा विचार अस्वस्थ करणारा ठरेल, यात शंका नाही. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी सुरक्षेच्या नावाखाली संविधान बाजूला ठेवण्याचा मार्ग स्वीकारला नाही. आज मात्र राष्ट्रीय हित या शब्दाचा वापर असहमती दाबण्यासाठी, प्रश्न विचारणाऱ्यांना संशयाच्या भोवऱ्यात ढकलण्यासाठी केला जातो. कठोर कायदे, तपास यंत्रणांचा वाढता वापर आणि भीतीचे राजकारणया सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर चाकूरकर यांची भूमिका ठळकपणे वेगळी दिसते. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे शक्य आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवले होते. राज्यपालपद आज अनेकदा राजकीय हस्तक्षेपाचे साधन बनत असताना, चाकूरकर यांनी राज्यपाल म्हणजे केंद्राचा प्रतिनिधी नव्हे, तर संविधानाचा रक्षक असतो, ही भूमिका जपली. आज जिथे निवडून आलेल्या सरकारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह लावले जाते, तिथे त्यांचा संयम, तटस्थता आणि संवादावरचा भर हा सत्तेला मर्यादा घालणारा ठरला असता. आजचे राजकारण कोण जोरात बोलतो यावर चालते; चाकूरकर यांचे राजकारण कोण योग्य बोलतो यावर उभे होते. आज जिथे प्रतिमा व्यवस्थापन, ट्रोल संस्कृती आणि भावनिक ध्रुवीकरण महत्त्वाचे मानले जाते, तिथे त्यांच्या मूल्याधिष्ठित राजकारणाला जागा उरली आहे का, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांचे अनंतात विलीन होणे म्हणजे एका सभ्य, संविधाननिष्ठ आणि मर्यादित सत्तेवर विश्वास ठेवणाऱ्या राजकारणाची आठवण करून देणारा आरसा आहे. प्रश्न इतकाच आहेआजचे राजकारण त्या आरशात स्वतःकडे पाहण्याची हिंमत दाखवेल का?

## लहान मुलींवरील अत्याचार प्रकरणांमध्ये फास्ट ट्रॅक न्याय; आरोपींना कठोर शिक्षा देण्यासाठी कटिबद्ध



नागपूर : राज्यात लहान मुलींवरील बलात्कार व खुनासारख्या अमानुष आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गुन्ह्यांमध्ये दोषींना तत्काळ आणि कठोर शिक्षा मिळावी, यासाठी शासन ठोस पावले उचलत आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात तीन वर्षीय बालिकेवर झालेल्या अत्याचाराची घटना विधानसभा सदस्य सुहास कांदे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मांडली, त्यावर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ही माहिती दिली.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपींना पोलीस तातडीने अटक करतात, मात्र न्यायप्रक्रियेला विलंब न होता गुन्हेगारांवर अपेक्षित वचक बसविण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित यंत्रणांशी चर्चा करून निर्णय घेण्यात आले आहेत.

मालेगाव तालुक्यातील प्रकरणामध्ये विशेष सरकारी वकील तत्काळ नेमण्यात येणार असून, हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवले जाईल. सर्व पुरावे आणि साक्षी वेळेत गोळा करून निश्चित कालमर्यादेत न्यायालयासमोर सादर करण्यात येतील, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

अत्यंत क्रूर, अमानवीय आणि समाजाला हादरवून टाकणाऱ्या घटनांमध्ये दोषींना फाशीपर्यंतची शिक्षा मिळावी, यासाठी शासन पूर्ण ताकदीने प्रयत्न करेल, असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अशा गुन्हेगारांना कायमचा धडा मिळाला पाहिजे आणि यासंदर्भात वचक बसला पाहिजे, ही शासनाची भूमिका असल्याचे सांगितले.

या लक्षवेधी सूचनेत सदस्य योगेश सागर, अतुल भातखळकर, किशोर पाटील, बालाजी कल्याणकर, श्रीमती सना मलिक यांनी उपप्रश्न विचारले.

# बुध्दगया एक ऐतिहासिक सहल –डॉ खंर माळवे–खरमा

भारतीय बौध्द महासभा पुणे जिल्हा पश्चिम अध्यक्ष प्रकाश ओव्हाळ, सचिव दलितानंद थोरात, पर्यटन उपाध्यक्ष पी.के.पवार, ता.जुन्नर माजी अध्यक्ष राकेश डोळस यांनी आयोजन केले होते.सहल म्हटले की लहानथोरांना आनंदाची मेजवानी मिळणे साहजिकच आहे.सध्याच्या काळात लांबच्या सहलीला जाणे म्हणजे १५ दिवसांची सहल खरं तर तारेवरची कसरत आहे कारण आपण सहलीला जाण्याच्या बातमीपत्र,घटना ऐकतो,शाळेतून सहसा कोणी विद्यार्थी पाठविणे जिकरीचे झाले आहे.तरी भारतीय बौध्द महासभा पुणे जिल्हा पश्चिम यांनी यशस्वीपणे सहल योजली,यांचे श्रेय आयोजकास जाते.एकून सहलीला आयु खंडू माळवे,सौ उषा माळवे,राजकुमार माळवे,बन्सी घायतडके,सौ वनिता घायतडके, बन्सी भोजणे,सिंधू साळवे,सचिन साळवे सौ सोनाली साळवे,सिंधू कडलाक,मारूती फुलपगार,रमेश लवांडे,संजय धोत्रे,सौ वैशाली डोळस,उदय डोळस,रत्नमाला डोळस,कुंदा फुलपगार, रोहिदास सोनवणे,जनाबाई सोनवणे,ताराबाई फुलपगार,प्रकाश कांबळे,सौ शोभा कांबळे,लालू कांबळे,सौ जयश्री कांबळे,उत्तम कांबळे,सौ वंदना



कांबळे,शालिनी भालेराव,दिपक कांबळे,सौ चंद्रकला कांबळे,माणिक सावंत,दिपक नितनवरे,श्रीकांत गायकवाड, सौ वंदना गायकवाड,चंद्रसेन गोतारणे, शशिकांत निकाळजे,बाळू गायकवाड,गुलाब गजरमल,दसरथ गायकवाड,विलास यादव,लता कदम,किसन ओव्हाळ,बारकु ओव्हाळ,बबन ओव्हाळ,भिमराव वाघमारे एकून ५३ तसेच जेवणाची उत्तम सोय , आचारी मामा,निलेश ढमाले,उषाताई मोकळे, अधिक उपासक,उपासिका हजर होते.यातच दोन लहान मुलांचाही सामावेश असल्याने आनखिनच वातावरण सुखद वाटत होते.

प्रवासात गाणी गोष्टीत रमबान झाले होते. माईक असल्याने अधिक रंगत आली होती १५ दिवस कसे गेले ते कळले नाही कारण पुणे ते दानापुर एक्स्प्रेसने प्रवास करीत मोगलसराई येथे उतरलो सारनाथ मुक्कामी पोहचलो तेथून बुध्दगयाकडे निघालो तेथिल प्रेक्षणिय स्थळे व येथिल संस्कृती दर्शन घेत मुक्कामी एक नवा अनुभव आला.जिल्हा राजगीर डुंग्रेश्वरी पर्वतावर जिथे भगवान गौतमबुद्ध यांनी कठोर तपश्चर्या केली,साधना केली जिथे जिथे मुक्काम केला येथिल अनुभव आनंदायक होता् राजगीर मुक्कामी कडाक्याची थंडी असतानाही जानवली नाही. नालंदा वैशाली नगर येथिल दर्शन घेत मुक्काम केला. केशरिया स्तूप दर्शन घेत कुशीनगर प्रवास दर्शन करीत नेपाळकडे रवाना झालो सकाळी संपुर्ण गौतमबुद्ध यांचे जन्मस्थान दर्शन घेत एक वेगळेच अनुभवले प्रत्यक्ष पहाणे व बोलणे यांचा साक्षात्कार झाला श्रावस्तीत प्रत्यक्ष पाहताना नव्या जुन्या बाबींची उजळणी होत होती.लखनौ तर गजबजलेले शहर डॉ बाबासाहेब आंबेडकर परिवर्तन स्थळ म्हणजे अंतर्मुख करणारा परिसर आहे. होय नक्कीच सहलीचा आनंद द्विगुणित झाला एकाअर्थानेआल्या जीवनाचे सार्थक झाले असे सहलीला आलेल्यांच्या तोंडून येत होते तसेच सांगता सभारंभी प्रत्येकाने आपले मनोगत सांगताना बहुतेकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू येत होते.कारण सहलीला जाण्यासाठी ज्या सुविधा हव्यात अशी उत्तम सोय केली होती, होय परतीचा प्रवासही उत्तम झाला १५ दिवस कसे गेले ते कळले सुद्धा नाही असा सुखमय पुण्यभुमीतील बुध्दगया भारतीय जनतेचे प्राणप्रतिष्ठा भूमी आहे

पुन्हा पुन्हा ऐतिहासिक स्थळे पाहण्याचा योग येवो हीच एक प्रार्थना

## मालवणी परिसराच्या पुनर्विकासासाठी 'क्लस्टर मॉडेल' विकसित करा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, : मालवणी परिसरातील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करताना ' क्लस्टर मॉडेल ' विकसित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत या परिसरातील अंबुजवाडी, दादासाहेब गायकवाड नगर व राजीव गांधी नगर येथील झोपड्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मालवणी परिसर पुनर्विकास प्रकल्प आढावा बैठकीस गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार असलम शेख उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मालवणी परिसरातील झोपड्यांचे राहिलेले सर्वेक्षण पूर्ण करावे. म्हाडा व झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांच्याकडे असलेल्या क्षेत्रानुसार त्यांनी सर्व्हे करावा. मालवणी परिसरातील संपूर्ण झोपड्यांचा सर्व्हे झाल्यानंतर यंत्रणांनी एकत्रितरित्या अहवाल द्यावा. कायदेशीर अडचणी असलेल्या क्षेत्राविषयी स्वतंत्रपणे कार्यवाही करावी. ज्या ठिकाणी विकासाची कामे असतील, ती क्षेत्रे पुनर्विकासासाठी प्राधान्याने घ्यावीत.

'क्लस्टर मॉडेल' ने विकास केल्यास संपूर्ण मालवणी परिसराचा कमी कालावधीत पुनर्विकास होईल. हा झोपडपट्टी पुनर्विकासाचा मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पास गतीने पूर्णत्वास न्यावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीस अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) असीम कुमार गुप्ता, गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणाली द्वारे मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी सहभागी होते. बैठकीत सादरीकरण म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी केले.

मालवणी पुनर्विकास योजना थोडक्यात–मालवणी परिसरातील जमिनीचे क्षेत्रफळ ६४१ एकर आहे. यामध्ये राज्य शासन, म्हाडा, महापालिका आणि खासगी जमिनीचा समावेश आहे. त्यापैकी ५६५.९८ एकर क्षेत्रावर झोपडपट्टी आहे. तसेच ७५.०२ एकर क्षेत्र खुले आहे. या परिसरातील अंदाजे झोपड्यांची संख्या १४ हजार इतकी आहे. परिसराच्या पुनर्विकासानंतर हे क्षेत्र झोपडपट्टीमुक्त होईल.

## महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध अधिनियमात सुधारणा प्रस्तावित करताना मनोरुग्ण, भिक्षेकरी यांची गरिमा राखा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

नागपूर,: महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध



करण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करताना केवळ कायदेशीर नव्हे तर मानवी हक्क, सामाजिक संवेदनशीलता आणि आधुनिक धोरणात्मक दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. यासाठी संपूर्ण अधिनियमातील सर्व कलमांची बारकाईने छाननी करून उचित, सन्मानजनक आणि काळानुरूप शब्दांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

या अधिनियमातील सुधारणा प्रस्तावित विधेयकाच्या अनुषंगाने विधानभवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. बैठकीस विधीमंडळ सचिव शिवदर्शन साठ्ये, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य सचिव धीरज कुमार, सचिव विधी व न्याय विभाग सतीश वाघोले, सचिव महिला व बालविकास नयना गुंडे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपसचिव विलास बेंद्रे, महिला व बालविकास विभागाचे उपसचिव आनंद भोंडवे यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, विधेयकातील काही शब्दप्रयोग आजच्या सामाजिक जाणिवांशी विसंगत ठरत असून त्यामध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. उदाहरणार्थ, 'वेडा' या शब्दाऐवजी 'मनोरुग्ण' हा अधिक सन्मानजनक व वैज्ञानिक शब्द वापरण्याबाबत विचार व्हावा. विकृतचित्त शब्द आवश्यकता नसल्यास वगळण्याबाबत विचार करावा. अशा प्रकारे संपूर्ण अधिनियमातील प्रत्येक कलमाची सखोल छाननी करून काळानुरूप आवश्यक बदल सुचवावेत, असे त्यांनी सांगितले.

अधिनियमात विधेयकाद्वारे सुधारणा करताना काळानुरुप झालेले सामाजिक बदल, उपलब्ध शास्त्रीय संशोधन, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश तसेच केंद्र सरकारने संमत केलेले नवे कायदे यांचा सर्वांगीण अभ्यास करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

समाजातील प्रत्येक घटकाचे मानवी हक्क अबाधित राहावेत, यासाठी अधिनियम अधिक संवेदनशील, समतोल आणि मानवकेंद्री करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व सुधारणा करण्यात याव्यात आणि अधिनियमातील सुधारणा करताना त्यांची गरिमा राखली जाईल, असे शब्दप्रयोग करण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देश उपसभापतींनी दिले.

## इतर मागासवर्ग बहुजन कल्याण संचालनालयाच्या संकेतस्थळाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

नागपूर, : इतर मागासवर्ग बहुजन कल्याण संचालनालयाच्या https://dirobbwd.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधानभवन येथील मंत्री परिषद सभागृहात झाले.



यावेळी इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, सचिव आप्पासाहेब धुळाज यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी संकेतस्थळाविषयी संचालक सोनाली मुळे यांनी माहिती दिली. नागरिकांना या संकेतस्थळावर विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या योजनांची माहिती, अर्ज करण्याची सुविधा आहे तसेच तक्रारींना कृत्रिम बुद्धिमत्तेवर उत्तर देण्याची सुविधा आहे. त्याचप्रमाणे योजनांची माहिती देणारे 'पॉडकास्ट' संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## म्हाडा प्राधिकरणाच्या रिक्त पदे आणि पदोन्नती प्रक्रियेला गती देणार मंत्री शंभूराज देसाई

नागपूर: म्हाडा प्राधिकरणाकडून कार्यकारी अभियंता पदोन्नतीच्या खात्यांतर्गत सेवाज्येष्ठता समितीसंदर्भात उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवर राज्य शासन सहा आठवड्यांच्या आत पदोन्नतीबाबत निर्णय घेईल. न्यायालयाने दिलेल्या कालमर्यादेपेक्षा आधीच, म्हणजे एका महिन्यात डीपीसी पूर्ण करून त्याचा अहवाल शासनाकडे सादर केला जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य अमीन पटेल आणि योगेश सागर यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

म्हाडाच्या कार्यकारी अभियंता संवर्गातील रिक्त पदांबाबतही डीपीसी घेऊन अहवाल शासनाकडे पाठवून येऊन भरती प्रक्रियाही ठरलेल्या कालावधीत पूर्ण केली जाईल, असे मंत्री देसाई यांनी सांगितले. तसेच शिपाई, उपअभियंता आदी इतर संवर्गातील रिक्त पदांबाबत अधिवेशनानंतर आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

म्हाडा प्राधिकरणात वाढलेला कामाचा ताण आणि विद्यमान आकृतीबंध लक्षात घेऊन, सामान्य प्रशासन विभागाच्या सल्ल्याने आकृतीबंध दुरुस्तीची आवश्यकता असल्यास त्याबाबतही योग्य निर्णय घेतला जाईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

# ग्रंथमित्र प्रा.धनंजय पवार यांचा सपत्नी सत्कार

लातूर :- हासाळा येथील श्री.गुणवंतराव



रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रा.धनंजय पवार यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ठ ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार मिळाल्याबद्दल दि.१० डिसेंबर मानवाधिकार दिनानिमित्त,वर्धा येथील लोक महाविद्यालयाच्यावतीने प्राचार्य डॉ.कमलताई गवई यांच्या हस्ते पत्नी सूचितासह भरपेहराव,शाल,स्मृतीचिन्ह,पुष्पहार घालून सन्मानीत करण्यात आले.

लोक शिक्षण प्रसारक मंडळ वर्धाच्यावतीने दि.१० डिसेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन आणि संस्थेचे प्रमुख संस्थापक दे.सी.हेमके गुरुजी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा.धनंजय पवार यांचा पत्नी सुचितासह महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष तथा लोकशिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ.कमलताई गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी इंजि.डॉ. गोविंद कासट,साहित्यिक प्रा.डॉ.नारायण निकम,संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश भोयर, कार्यक्रम संयोजक मोहन सोनूरकर,लोक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र सहारे,राज्य ग्रंथालय संघाचे सहकार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले,राज्य ग्रंथमित्र पुरस्कार विजेते युवराज जाधव आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

# शिवराज पाटील यांच्या सारखे अजातशत्रू राजकारणी पुन्हा होणे नाही – विनोद खटके



लातूर : देशाच्या राजकारणात सर्वोच्च पदे भूषवून देखील राजकारणात एकही शत्रू नसलेले व्यक्तिमत्व म्हणजे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले आदरणीय शिवराज पाटील साहेब. देशाच्या राजकारणात काम करत असताना कितीही मोठे पद असले तरी अहंकाराला कधीही त्यांनी जवळ केले नाही अतिशय मृदूभाषी राजकारणी म्हणून त्यांनी देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

आजच्या काळात राजकारणी विरोधकावर टीकाटिपणी करत असताना कुठलेही भान ठेवत नाहीत परंतु गेली कित्येक दशके राजकारणात राहून कधीही आपला सुसंस्कृतपणा न सोडणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय शिवराज पाटील साहेब यांच्या जाण्याने राजकारणात सुसंस्कृत पणाची कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे आजच्या पिढीने त्यांचा आदर्श घेऊन आपली वाटचाल करावी असे मत व्ही एस पँथर्स चे सं अध्यक्ष विनोद खटके यांनी माजी लोकसभा सभापती तथा माजी केंद्रीय गृहमंत्री यांच्या निधनानंतर आपले मत व्यक्त केले.

# १६ वर्षाखालील मुलांना राज्यातील,देशातील प्रमुख सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरण्यास बंदी घालण्याची अँड प्रदिपसिंह गंगणे यांची मागणी

लातूर (प्रतिनिधी):- नागपूर हिवाळी



अधिवेशन काळात विधानभवनात राज्याचे महिला व बालविकास राज्यमंत्री ना. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांची भेट घेऊन सक्षम महिला, सदृढ बालक एक जनआंदोलनचे मुख्यप्रवर्तक अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी निवेदनाद्वारे

१६ वर्षाखालील मुलांना राज्यातील,देशातील प्रमुख सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरण्यास बंदी घालण्याची मागणी केली आहे.

लहान मुलांनमध्ये सोशल मीडियाचे वाढते व्यसन आणि त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारे दूरगामी गंभीर परिणाम लक्षात घेऊन पाश्चिमात्य देशांमध्ये जसे की, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये १६ वर्ष वयोगटाखालील मुलांना देशातील प्रमुख सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे त्याच प्रमाणे कोवळ्या वयातील बालकांचे ऑनलाईन धोक्यापासून मानसिक , शारीरिक संरक्षण करण्यासाठी आपन पुढाकार घेऊन सोसियल मिडिया प्लॅटफॉर्म वापरण्यास बंदी घालण्याचा धोरणात्मक निर्णय घेवून मोठे पाऊल उचलावे ही विनंती करण्यात आली

# सर्वसामान्य माणसाचं म्हणनं ऐकून घेणारा नेता– केशव कांबळे

लातूर: लातूरच्या आणि देशाच्या राजकारणात दिर्घकाळ एक स्वच्छ राहून सर्वसामान्य माणसाचं म्हणे ऐकुन त्याची जाग्यावर सोडवणुक करणार व्यक्तीमत्व म्हणजे माजी केंद्रीय मंत्री, लोकसभाध्यक्ष, राज्यपाल आदी पदांवर राहुन लातूर चे नेतृत्व केले.लातूरशहरात त्याकाळात नव्याने होत असलेल्या वैशाली बुद्ध विहारात फक्त एकदाच अडचण सांगताच ती ऐकून घेवून



तात्कालीन लातूर नगरपरीषदेच्या माध्यमातून भरीव मदत करुन बुद्ध विहाराच्या कामाला चालना दिली तो क्षण आमच्या कायम स्मरणात आहे. निष्कलंक चारित्र्य आणि प्रश्नांची जाण असणारं व्यक्तीमत्व म्हणुन शिवराज पाटील साहेबांनी जपणुक केली.आशा या व्यक्तीमत्वास वैशाली सार्वजनिक बुद्ध विहाराच्या वतीने भावपुर्ण श्रद्धांजली.

# तिरुपती – पंढरपूर साप्ताहिक रेल्वेसेवा २० डिसेंबरपासून : निलेगांवकर

लातूर : येत्या दि.२० डिसेंबर २०२५ पासून तिरुपती – पंढरपूर व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार आहे. यापूर्वी ही सेवा १३ डिसेंबरला सुरु होणार होती, मात्र ही रेल्वेसेवा आता २० तारखेपासून सुरु होत असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.



तिरुपती – पंढरपूर ही गाडी लातूरमार्गे सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे तिरुपती– पंढरपूर – तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०३२ ही तिरुपती – पंढरपूर – तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. ही गाडी यापूर्वी दि. दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून सुरु होणार होती. मात्र आता ती येणाऱ्या शनिवारपासून म्हणजे दि. २० डिसेंबर पासून सुरु होत आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल. या गाडीला रेणिगुंटा, राजमपेटा, ओंटिमिट्ट, कडपा, येरगुंटला, ताडिपत्रि, गूटी, डोन, कर्नूलु सिटी, गदवाल, वनपर्ती रोड, महबूबनगर, जडचर्ला, शादनगर, उमदानगर, काचीगुडा, सिकंदराबाद, बेगमपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, जहीराबाद, बीदर, भालकी, उदगीर, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डूवाडी, मोडलिंब असे थांबे देण्यात आले आहेत. यामध्ये धाराशिव आणि बार्शी हे दोन थांबे वाढविण्यात आले आहेत. अगोदरच्या वेळापत्रकात हे थांबे नव्हते. ही एक सुविधा या गाडीसाठी वाढविण्यात आली आहे. ही गाडी दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०३२ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ३ एसी थ्री टिअर , १४ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी जनरल , २ गार्ड कम ब्रेक व्हॅन असे एकूण २४ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. २० डिसेंबर ते दि. १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले. रेल्वे प्रवाशांसाठी अतिशय आनंदाची आणि समाधानाची बाब म्हणजे येत्या शनिवारी निघणाऱ्या गाडीचे आरक्षण फुल्ल या झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली. प्रवाशांकडून असाच प्रतिसाद मिळाल्यास ही गाडी पुढील काळात नियमित करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असेही संजय निलेगांवकर यांनी सांगितले.

# लोकनेते स्व. मुंडे साहेब यांच्या लातूर येथील पूर्णाकृती पुतळ्यास.युवा नेते ऋषिकेश कराड यांच्यासह अनेकांकडून पुष्पांजली अर्पण

लातूर – ग्रामीण जनतेचे लोकाभिमुख लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील पूर्णाकृती पुतळ्यास भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष तथा युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेकांनी पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा महाराष्ट्रातील शासकीय जागेत कदाचित पहिला भव्य पुतळा लातूर येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या पुढाकारातून उभारण्यात आला असून राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या शुभहस्ते या पुतळ्याचे नुकतेच अनावरण करण्यात आले आहे.

१२ डिसेंबर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा जन्मदिवस. यानिमित्ताने भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी भाजपाचे डॉ. बाबासाहेब घुले, प्रताप पाटील, विजयकुमार मलवाडे, सुरज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, बाबासाहेब भिसे, शामसुंदर वाघमारे, सुकेश भंडारे, अमर चव्हाण, आदीनाथ मुळे, शहानुर बागवान, ललिता कांबळे, शिलाताई आचार्य, धनराज शिंदे, अशोक सावंत, शंकर चव्हाण, ज्ञानेश्वर जूगल, राम भताने, भागवत गिते, शुभम खोसे, सुरेश सुर्यवंशी, नानासाहेब कसपटे, अंकूश गणगे, बाबासाहेब देवकर, पिंटू डोंगरे यांच्यासह अनेकांनी पुष्पांजली अर्पण करून मुंडे साहेबांना विनम्र अभिवादन केले यावेळी भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त केज येथील शिक्षक कॉलनीत चौंकाची स्थापना!

केज/प्रतिनिधी – लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त केज येथील शिक्षक कॉलनी , बीड रोड केज मध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. लोकनेते मुंडे साहेब यांच्या कार्याचे स्मरण करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आणि याच निमित्ताने शिक्षक कॉलनीत बीड रोडला त्यांच्या नावाने एका चौकाची स्थापन करण्यात आली.

यावेळी 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब चौक' शिक्षक कॉलनी केज असे नामकरण करून त्याचे लोकार्पण करण्यात आले.




या महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्थानिक युवकांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. पत्रकार प्रकाश मुंडे, चंदू चौरे, अमोल ठोंबरे, गोटू भैय्या पाळवदे, अमोल मुंडे, योगेश हांगे, हानुमंतराव चौरे, सोनू वैभव धस, अमोल धस, रोहित मुंडे, अमोल घुले, गणेश ढाकणे, सचिन मुंडे,प्रविण थोरात, चिकू चौरे आणि राजा राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम अतिशय यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला.

शिक्षक कॉलनीतील या चौकामुळे स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या स्मृतीला कायम उजाळा मिळेल, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# शिवसेना उभाठा पक्ष जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुका ताकतीनशी लढविणार-परशुराम जाधव

केज/प्रतिनिधी–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक ताकतीने लढवणार बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी केज येथील बैठकीत आवाहन केले.



शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून शिवसेना नेते माजी विरोधी पक्षनेते मा. अंबादासजी दानवे,मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली केज, अंबाजोगाई,परळी तालुका शिवसेना युवा सेना महिला आघाडी पदाधिकाऱ्याची बैठक बीड जिल्हा संपर्क कार्यालय केज येथे संपन्न झाली.

सदरील बैठकीत येणाऱ्या जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकी संदर्भात गटनिहाय बुथनिहाय चर्चा करण्यात आली.

येणाऱ्या निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या समवेत सर्व शिवसेना नेते उपनेते, खासदार,आमदार स्टार प्रचारक ताकतीनिशी निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. करिता पूर्व नियोजनसाठी अंबाजोगाई, परळी,केज तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कल निहाय बैठका घेऊन चार दिवसात अहवाल सादर करण्याचे संपर्क प्रमुख यांनी आवाहन केले.

यावेळी बैठकीला मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे उपजीवप्रमुख दीपक मोराळे नारायणजी सातपुते सचिव रोहित कसबे संघटक अशोक गाढवे केज तालुका प्रमुख अशोक जाधव, अंबाजोगाई तालुका प्रमुख श्रीधर गरड परळी तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शहर प्रमुख अशोक हेडे राजेश विभुते तात्या रोडे उपतालुका प्रमुख महेश केंद्रे आप्पासाहेब कांबळे सुभाष ठोबरे सुरज वाघमारे लक्ष्मण गलांडे बापू गोरे बाळासाहेब कसबे उगलमुगले पप्पू ढगे आतम घाडगे माजी उपसभापती शशिकांत तारळकर निलेश जाधव बाळू फुलझलके सह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

